# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 09/06/2023 (शुक्रवार) सायंकाळ

---

## फसवणुक

**पो.स्टे. उमरेड** :– अंतर्गत ०२ कि.मी. अंतरावरील मौजा बुधवारीपेठ उमरेड सरकारी दवाखान्यासमोर येथे दिनांक ०१/०६/२०२३ चे ११.०० वा. ते दिनांक ०८/०६/२०२३ चे १२.०० वा. दरम्यान फिर्यादी नामे– पंकज चंद्रभान भुरसे, वय २३ वर्ष, रा. बुधवारीपेठ उमरेड याचे मामे भाऊ नामे– तुषार नवघरे यांचा ग्रामिण रूग्णालय उमरेडचे समोर पानठेला असुन तो दुकान सांभाळतो. दि. ०१/०६/२०२३ रोजी ११.०० वा. फिर्यादी हा (पानठेला) दुकानात जावुन बसले असता एक व्यक्ती हा दुकानात आला व म्हणाला की मला लग्नाला जायचे आहे व माझे भावाची तबीयत खराब आहे त्यामुळे मला पैशाची आवश्यकता आहे माझे कडे पैसे नाही माझी गरज भागवा असे म्हणुन त्याने त्याचे जवळील OPPO MODAL A77 S5G नविन ब्लु फेम रंगाचा मोबाईल दाखविला ज्याची सध्या मार्केट किंमत १८०००/–रू आहे असे सांगुन तो मोबाईल १५०००/– रूपयात विकायचे आहे व मोबाईलचे बिल दाखविले तो मोबाईल ११०००/– रू. विकत घेते वेळी फिर्यादीने त्या व्यक्तीचे नाव गाव विचारले असता त्याने आपले नाव प्रकाश वामनराव पवार, रा. मेंढेपठार ता. काटोल जि. नागपुर असे सांगुन रू ११०००/– घेवुन निघुन गेला. फिर्यादीने विकत घेतलेला मोबाईल चेक करून सिम टाकले असता मोबाईल मध्ये सिम लागत नव्हते तेव्हा फिर्यादीने मोबाईल उमरेड येथील मोबाईल वर्ल्ड या दुकानात दाखविले असता त्याने हा मोबाईल डमी पिस आहे. हा मोबाईल फक्त ग्राहकांना सॅम्पल म्हणुन दाखविण्याकरीता कंपनी पुरवित असते. दि. ०८/६/२०२३ रोजी १२.०० वा फिर्यादी हा तुषार नवघरे यांचे दुकानात असता तुषार नवघरे यांनी फिर्यादीस एक इसम सत्यम हॉल समोरील पाणेठेले वाला मौसम खोब्रागडे यास एक इसम मोबाईल विकण्यास आला आहे असे सांगितले यावरून फिर्यादी तेथे गेले असता प्रकाश पवार हा तेथे मिळुन आला तेव्हा प्रकाश पवार याने मौसम खोब्रागडे याला सुध्दा त्याचे डमी मोबाईल ११०००/– रू विकला होता. यातील फिर्यादीला नमुद आरोपी नामे– **प्रकाश पवार** यांनी - OPPO MODAL A77 S5G डमी मोबाईल पिस दाखवुन खरा मोबाईल असल्याचे सांगुन फिर्यादीची ११०००/– रू. ची फसवणुक केली आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. उमरेड येथे आरोपीविरुध्द कलम ४२० भांदवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीला अटक केली असुन सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलीस हवालदार गणेश गिरडकर मो. नं. ७४४७३५५७४९ हे करीत आहे.

## अपघातात मृत्यु

**१) पो.स्टे. सावनेर** :– अंतर्गत पांढुर्णा रोड सावनेर हेटी जवळ दिनांक ०८/०६/२०२३ चे ०९.३० वा. दरम्यान फिर्यादी नामे– प्रकाश राजेंद्र नानवटकर, वय ३० वर्ष रा. चिचपुरा वार्ड नं. १४ सावनेर याची **मृतक काकु नामे– उर्मीला गणपत नानवटकर, वय ४० वर्ष, रा. चिचपुरा वार्ड नं. १४ सावनेर** ही यातील आरोपी नामे– मंसाराम फुलसिंग कुभरे रा. मानेगांव यांचे मोटरसायकल क्र. एम. एच.–४० डी– ३८०२ वर लिफ्ट मागून त्यांचे मोटर सायकलवर मागे बसून कंपनीत कामाला जात असंतांना सावनेर ते पांढुर्णा रोडवर सावनेर हेटीजवळ यातील आरोपीने आपले मोटरसायकल हयगयीने व निष्काळजीपणे चालविल्याने सदर मृतक ही खाली पडली त्यामुळे तिला डोक्याला व शरीराला रोडचा मार लागल्याने सदर महीला हिला लोकांनी सरकारी दवाखाना सावनेर येथे ॲब्युलंसने नेले असता डॉक्टरांनी तपासून मृत घोषीत केले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. सावनेर येथे आरोपी चालकाविरुध्द कलम २७९, ३०४ (अ) भादवी कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास सहायक पोलीस निरीक्षक भस्मे मो. नं. ९७६४९४६८०८ हे करीत आहे.

**२) पो.स्टे. कळमेश्वर** :– अंतर्गत १० किमी अंतरावर कोहळी शिवार दिनांक ०७/०६/२०२३ चे २०.०० वा. ते २०.३५ वा. दरम्यान यातील **मृतक नामे– अश्विन शिवाजी शिंगारे, वय ४० वर्ष, रा. साई नगर दाबा नागपूर ह. मु. कळमेश्वर** हे फिर्यादी नामे– राहुल शिवाजीराव शिंगारे, वय ४३ वर्ष, रा. साईनगर दाबा प्लॉट नं. ८६ नागपूर यांचे भाऊ असुन घटना तारखेला मृतक हे त्याचे जवळील असणारी मोटरसायकल क्र. एम.एच–३१/एफ.एन– ९३९९ होंडा शाईनने साक्षगंधाचे कार्यक्रम वरूड येथुन आटपुन कळमेश्वरकडे येत असता कोहळी शिवारात आरोपी वाहन क्र. एम. एच–४०/बी. एच– ७८०९ च्या चालकाने त्याचे ताब्यातील वाहन भरधावपणे निष्काळजीपणे चालवुन सदर अपघातात फिर्यादीच्या भावाचे मरणास आरोपी हा कारणीभुत झाला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. कळमेश्वर येथे आरोपी चालकाविरुध्द कलम २७९, ३०४ (अ), ३३७ भादवी कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास सपोनि. दीलीप पोटभरे मो. नं. ९९२३००२६६४ हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**